# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, नागपूर

**प्रकल्पग्रस्तांकरीता जाहिरात क्र. ४/२०१७ अंतर्गत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची सुधारीत तात्पुरती निवड यादी / प्रतिक्षा यादी**

------

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र. ०४/२०१७ अन्वये प्रकल्पग्रस्तांकरीता तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाच्या दि. १७.०२.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच, जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे म.रा.वि.मंडळ / म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित मध्ये वीजतंत्री व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व महापारेषण कंपनीसाठी जमीन दिलेल्या कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना अतिरिक्त गुण देऊन त्याचप्रमाणे जाहिरातीत नमूद केलेली तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदाची संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेवून तसेच या पदासाठी झालेल्या ऑनलाइन परिक्षेच्या जाहिर केलेल्या प्रश्न व उत्तर पत्रिकेवर प्राप्त झालेल्या आक्षेपावर योग्य ती कार्यवाही करुन निकाल तयार करुन दिनांक ०७.०४.२०१८ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर सुचनापत्र प्रसारीत करण्यात आले होते. सदर सुचनापत्रामध्ये दिलेल्या अट व शर्त क्रमांक १३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार कागदपत्रे पडताळणीसंबंधीची सुचना दिनांक १७.०४.२०१८ रोजी प्रसारीत करुन तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना दिनांक २४ व २५ एप्रिल २०१८ रोजी कागदपत्रे पडताळणीकरीता बोलविण्यात आले होते.

दिनांक ०७.०४.२०१८ रोजीच्या तात्पुरत्या निवड यादीतील दोन्ही उमेदवार दिनांक २४.०४.२०१८ रोजी कागदपत्रे पडताळणीकरीता **मुख्य अभियंता यांचे कार्यालय,अ.उ.दा.प्रकल्प नि संवसु परिमंडळ,नागपुर** येथे हजर झाले होते. सदरहु दि.०७.०४.२०१८ रोजीच्या तात्पुरत्या निवड यादीतील अनुक्रमांक १ वर असलेले श्री.निलेश प्र.भुजाडे यांनी ऑनलाईन अर्जामध्ये म.रा.वि.मं/महापारेषण वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी पूर्ण केले असल्याची नोंद केली आहे.परंतु त्यांची कागदपत्रे पडताळणी करतांना त्यांचे शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण महावितरण कंपनीतले असल्याचे कागदपत्रावरुन आढळले.त्यानुसार जाहिरात क्र.०४/२०१७ मधील मुद्दा क्र.११(५) मध्ये दिल्यानुसार त्यांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांवर १०% अधिक गुण मिळाल्याने एकुण प्राप्त गुणांच्या आधारे तात्पुरत्या निवड यादीत समावेश केला.परंतु त्यांचे वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण महावितरण कंपनीचे असल्यामुळे,जाहिरातीतील अट पूर्ण करत नसल्यामुळे, त्यांना देण्यात आलेले १०% अधिक गुण कमी करुन खालीलप्रमाणे सुधारीत तात्पुरती निवड यादी/प्रतिक्षा यादी प्रसारीत करण्यात येत आहे.

| Sr No. | Roll No | Candidate Name | Category |
|---|---|---|---|
| SELECT LIST | | | |
| 1 | 1410500855 | ANIL KEWALRAM TULASKAR | OPEN |
| 2 | 1410500818 | PRAVIN NILKANTHRAO BELKHODE | OPEN |
| WAIT LIST | | | |
| 1 | 1410601039 | NILESH PRABHAKAR BHUJADE | OPEN |

सही/-
मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, नागपूर

दिनांक:- **०२.०५.२०१८**

**********